# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.05.2025** **वारःशुक्रवार**

1. पाकिस्तानच्या कुरापतीना भारताचं चोख प्रत्युत्तर
2. पाकिस्तानची आठ क्षेपणास्त्रं भारताकडून निकामी; घुसखोरीचा प्रयत्नही हाणून पाडला
3. सरकारच्या दहशतवादविरोधी कृतीला सर्वपक्षीय बैठकीत संपूर्ण पाठिंबा
4. राज्याची आर्थिक स्थिती उत्तम असल्याचा 16व्या वित्त आयोगाचा निर्वाळा आणि
5. खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राला 53 पदकं, पदकतालिकेतलं अव्वल स्थान कायम

**पाक क्षेपणास्त्रं**

जम्मू आणि काश्मीरच्या सतवारी, सांबा, आरएसपुरा आणि आर्निया भागात पाकिस्ताननं काल आठ क्षेपणास्त्रं सोडली. मात्र भारताच्या हवाई संरक्षण तुकड्यांनी सर्व क्षेपणास्त्रं वाटेतच अडवून निकामी केल्याचं संरक्षण दलाच्या सूत्रांनी सांगितलं. जम्मू भागातली दृष्यं हमासनं इस्रायलवर केलेल्या हल्ल्याची तंतोतंत आठवण करून देणारी होती. पाकिस्तानी सैन्य एखाद्या दहशतवादी संघटनेप्रमाणे वागत आणि काम करत आहे, असंही या सूत्रांनी नमूद केलं. पाकिस्तानची आयएसआय संघटना आणि हमासची गेल्या महिन्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये भेट झाली होती.

आंतरराष्ट्रीय सीमारेषेनजीक असलेल्या जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर भागांनाही पाकिस्ताननं लक्ष्य करत क्षेपणास्त्रांचा वापर केला. मात्र भारतीय सैन्यानं योग्य पद्धतीनं हे हल्ले परतवून लावले. त्यामध्ये कुठलीही हानी झाली नाही, अशी माहितीही संरक्षण सूत्रांनी दिली. दरम्यान रात्री 11 वाजण्याच्या सुमारास सीमा सुरक्षा दलानं जम्मू आणि काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेल्या सांबा भागात घुसखोरीचा मोठा प्रयत्न हाणून पाडला.

दरम्यान भारतीय संरक्षण दलानं काल पाकिस्तानच्या हवाई संरक्षण प्रणालीवर हल्ला केला. यात लाहोर इथली संरक्षण प्रणाली नष्ट झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी काल संध्याकाळी अमेरिकीचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली. भारतानं सीमेपलीकडील दहशतवादाला लक्ष्यित आणि संतुलित प्रत्युत्तर दिलं असल्याचं त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. जयशंकर यांनी काल युरोपीय महासंघाच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण विभागाचे वरिष्ठ प्रतिनिधी काजा कल्लास तसंच इटलीचे परराष्ट्र मंत्री एंटोनिओ ताजानी यांच्याशीही सध्या सुरू असलेल्या घडामोडींबद्दल चर्चा केली.

**पत्रकार परिषद**

22 एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ला हे सध्याच्या तणावाचं मूळ कारण आहे आणि भारत फक्त त्याला प्रत्युत्तर देत आहे असं काल भारतातर्फे ठामपणे सांगण्यात आलं. काल नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्रालय आणि संरक्षण विभागाची संयुक्त पत्रकार परिषद झाली, त्यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली. तणाव वाढवण्याची भारताची इच्छा नाही, ऑपरेशन सिंदूरमध्ये केवळ दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करण्यात आलं असं मिस्त्री म्हणाले. यापुढे जर पाकिस्ताननं काही आगळीक केली तर त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

या पत्रकार परिषदेत संरक्षण विभागातर्फे कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग सहभागी झाल्या होत्या. काल पाकिस्ताननं उत्तर आणि पश्चिम भारतातल्या अनेक लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे हल्ल्याचा प्रयत्न केला मात्र भारतीय सैन्यानं तो निष्प्रभ ठरवला असं कर्नल कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितलं.

**सर्वपक्षीय बैठक**

ऑपरेशन सिंदूरबाबत विरोधी पक्षांना माहिती देण्यासाठी काल नवी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्वच नेत्यांनी भारतीय सैन्याच्या शौर्याची प्रशंसा केली तसंच सरकारला संपूर्ण पाठिंबा असल्याचं सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर माध्यमांच्या प्रतिनिधींना ही माहिती दिली. केंद्रिय मंत्री अमित शहा, डॉक्टर एस. जयशंकर, काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे आणि विविध पक्षांच्या नेत्यांसह प्रफुल्ल पटेल, सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे, संजय राऊत हे राज्यातले नेतेही उपस्थित होते.

**वित्त आयोग**

16व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉक्टर अरविंद पनगढिया यांनी काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. महाराष्ट्रात वित्तीय तूट कमी असून पारंपरिक वित्त धोरण राबवलं जात आहे तसंच केंद्र सरकारनं आखून दिलेल्या कर्जाच्या मर्यादा पाळल्या जात आहेत असं मत पनगढिया यांनी या भेटीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. राज्याची आर्थिक शिस्त उत्तम असल्याचं ते म्हणाले. केंद्राच्या करातील राज्यांचा वाटा 50 टक्क्यांपर्यंत वाढवावा, ग्रामीण आणि शहरी भागांसाठीच्या निधी वाटपात स्पष्ट फरक असावा अशी शिफारस यावेळी राज्य शासनानं केली. राज्याच्या आर्थिक गरजांचं मूल्यांकन करणं आणि निधी वाटपाबाबत संबंधितांशी विचार विनिमय करणं या उद्देशानं वित्त आयोग सध्या दोन दिवसांच्या राज्याच्या दौऱ्यावर आहे.

**शालेय शिक्षणमंत्री**

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आता राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाणार आहे. याबाबत राज्य शासनानं केंद्र सरकारकडे मागणी केली होती. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यात काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. त्यावेळी राज्य सरकारच्या मागणीला मान्यता मिळाल्याची माहिती भुसे यांनी दिली. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित सचिवांना केंद्रीय पाठ्यपुस्तक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या म्हणजेच NCERT च्या पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा समावेश करण्याचे निर्देश दिले.

**आयटीआय**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या आयटीआयच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज असून याचं प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतलं पाहिजे, असं कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी सांगितलं. 'आयटीआय' मध्ये सहा नवे अभ्यासक्रम लागू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता), ईव्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

**सायबर सुरक्षा**

सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र सायबरच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट आणि सायबर जागरुकता माहितीपटाचं अनावरण काल मुंबईत झालं; त्यावेळी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हा चॅटबॉट महाराष्ट्र सायबरच्या 1945 या हेल्पलाईनशी जोडला असून सायबर गुन्ह्याबबत तक्रार कशी करावी, यासंबंधीची माहिती या चॅटबॉटमध्ये मिळणार आहे.

**आरोग्य तपासणी-नाशिक**

या वर्षापासून अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या कुटुंबाची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येईल, अशी घोषणा राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी नाशिक इथं केली. पिंक ई रिक्षा वितरण आणि विविध शासकीय योजनांच्या लाभ वितरण सोहळ्यात त्या काल बोलत होत्या.

**अपघात-रायगड**

रायगड जिल्ह्यात तळा मांदाड रस्त्यावर काल झालेल्या एसटी बस आणि डंपरच्या अपघातात 4 प्रवाशांचा मृत्यू झाला तर 20 जण जखमी झाले आहेत. तारणे इथल्या तीव्र वळणावर भरधाव डंपरनं बसला धडक दिल्यामुळे हा अपघात घडला.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत काल महाराष्ट्रानं पदकांचं अर्धशतक पूर्ण करत पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम राखलं. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 20 सुवर्ण, 18 रौप्य  आणि 15 कास्य अशी एकंदर 53 पदकं पटकावली आहेत. काल संपलेल्या सायकलिंग आणि मल्लखांब स्पर्धेची महाराष्ट्राने सुवर्ण सांगता केली. सायकलिंग स्पर्धेत 3 सुवर्ण 2 रौप्य आणि 1 कास्य पदकं मिळवत महाराष्ट्राने उपविजेतेपद पटकावलं. मल्लखांब स्पर्धेत 2 सुवर्ण 5 रौप्य आणि 2 कास्य अशी 9 पदकं कमवून महाराष्ट्राने उपविजेतेपदावर नाव कोरले. जलतरणात सर्वाधिक 19 पदके महाराष्ट्राने जिंकली आहे. तीरांदाजीमध्ये 6 सुवर्ण पदकांसह 9 पदकांची विक्रमी कामगिरी महाराष्ट्राने केली आहे. कबड्डीमध्ये महाराष्ट्र संघाने रौप्य पदक मिळवले. सायकलिंगमध्ये पुण्याच्या सिद्धेश घोरपडेने पदकांची हॅट्ट्रिक केली. पुण्याच्या शांभवी क्षीरसागर हिने नेमबाजीतील 10 मीटर एअर रायफलमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. मल्लखांबमध्ये साताऱ्याच्या आर्या साळुंखेने सुवर्ण कामगिरी केली.

**आयपीएल**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आय पी एल क्रिकेट स्पर्धेतील धरमशाला इथं होणारा पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यातला कालचा सामना रद्द करण्यात आला. दरम्यान पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात येत्या रविवारी धरमशाला इथं नियोजित असलेला सामना आता अहमदाबाद इथं खेळला जाणार आहे.

**पाऊस**

राज्यात काल विविध ठिकाणी पावसानं हजेरी लावली. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात काल जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे आंबा पिकाचं नुकसान झालं असून आंबा बागायतदार चिंतेत आहेत. नाशिक जिल्ह्यात गेले तीन दिवस पाऊस पडतो आहे. गारपिटीमुळे शेतपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वच विभागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**